Exh. 9

रे.क.नं.२२/२०२६

# मे. कागल येथील सि.ज.ज्यु.डि.
# यांचे कोर्टात ...

मारुती तुकाराम पाटील ......... वादी

विरुध्द

शेवंता शिवाजी पाटील वगैरे ......... प्रतिवादी

**<u>यातील प्रतिवादी नं. १ व २ तर्फे वादीचे दावेस कैफियत व मनाई अर्जास म्हणणे पुढील प्रमाणे :-</u>**

Order
Read and Recorded
C.J.J.D.,Kagal
Dt.23.03.2026

१) वादीचे दावेतील व मनाई अर्जातील सर्व मजकूर चुकीचा, खोटा, लबाडीचा असून तो प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही.

MADKE AJIT BHISHMA
Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.03.24 17:19:48 +0530



Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

२) दावा अर्जी कलम १ ते ६ व मनाई अर्जामधील सर्व मजकूर चुकीचा खोटा, लबाडीचा असून प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही. दावा मिळकतीचे वर्णन पूर्णपणे चुकीचे आहे. दावा मिळकतीच्या वाटण्या झालेल्या नाहीत व दावा मिळकतीमध्ये वादीची कब्जेवहिवाट आहे व दावा मिळकतीमध्ये वादी आपले शेतघर बांधून राहत आहे ही कथने पूर्णपणे खोटी,चुकीची असून यातील प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाहीत. तुकाराम हे अशिक्षित, वयस्कर व आजारी असलेचा गैरफायदा घेवून रजि.दस्त नं.२६९/२०१८ चा दस्त प्रतिवादी नं.१ यांनी आपले हक्कामध्ये नोंदविल्याचे वादी यांना मे २०२३ मध्ये समजून आल्याचे कथन पूर्णपणे खोटे व चुकीचे आहे. त्याचप्रमाणे सदरच्या दस्तास वादी यांची संमती घेतलेली नव्हती व नाही, हे कथन गैरलागू आहे. दैनिक पुढारी कोल्हापूर या वृत्तपत्रामध्ये दिनांक ०५/०५/२०२३ इ. रोजी वादी यांनी जाहीर नोटीस प्रसिध्द केल्याचे कथन पूर्णपणे खोटे व चुकीचे आहे. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी नं.१ यांची कब्जेवहिवाट नसताना प्रतिवादी नं.१ यांनी प्रतिवादी नं.२ चे हक्कामध्ये रजि.दस्त नं.११४/२०२६, दि.१४/.०१/२०२६ चा विनाकब्जाचा दस्त नोंदवला व दावा मिळकतीमध्ये वादी यांचे घर असून उर्वरित क्षेत्रामध्ये वादी यांनी सोयाबीन व भात पिके घेतल्याचे दावेतील कथन पूर्णपणे खोटे,



Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

चुकीचे व लबाडीचे असून ते प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही. दिनांक ०१/०१/२०२६ इ. रोजी वादी हे दावा मिळकतीमध्ये कष्टमशागत करीत असल्याचे व त्यावेळी प्रतिवादी नं.२ यांनी वादीना कथने करुन हरकत, अडथळा केल्याचे कथन पूर्णपणे खोटे व चुकीचे आहे. त्याचप्रमाणे वादीच्या वडिलांना प्रतिवादी नं.१ यांचे हक्कामध्ये खरेदीपत्र करुन देणेचा अधिकार नसल्याचे अगर सदर मिळकत विक्री करणेची कोणतीही गरज नसल्याचे कथन पूर्णपणे खोटे व चुकीचे आहे. त्याचप्रमाणे तुकाराम हे आजारी असलेचा गैरफायदा घेवून संगनमताने दस्त केल्याचे व सदर दस्ताने प्रतिवादी नं.१ यांना कोणतेही हक्क प्राप्त झाले नसल्याचे व सदरचा दस्त वादीवर बंधनकारक नसल्याचे कथन पूर्णपणे खोटे व चुकीचे आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी नं.१ यांना सदर दस्ताचे आधारे दावा मिळकती मध्ये मालकी प्राप्त झाली नसल्याचे व प्रतिवादी नं.२ चे हक्कामध्ये दस्त नंबर ११४/२०२६ चा दस्त विनाकब्जेचा व बोगस नोंदविल्याचे व प्रतिवादी नं.२ यांना कोणतेही अधिकार प्राप्त झाले नसल्याचे कथन पूर्णपणे खोटे व चुकीचे आहे. प्रतिवादी नं.२ या त्रयस्त आहेत व त्यांचा वाडवडिलार्जीत मिळकतीशी काहीही संबंध नसल्याचे कथन पूर्णपणे खोटे व चुकीचे आहे.प्रतिवादी नं.२ यांनी खरेदीपत्राच्या आधारे वादीस हरकत, अडथळा केल्याचे कथन पूर्णपणे खोटे व चुकीचे आहे.



Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

३) दावेस कारण घडलेले नाही. दावा अर्जी कलम ७ मध्ये नमूद केलेले दावेस कारण चुकीचे,खोटे असून प्रतिवादींना मान्य व कबूल नाही.

४) वादीस दावा अर्जी कलम ११ मध्ये मागितलेली दाद कायद्याने देता येणार नाही. आणले स्वरुपात वादीचा दावा कायद्याने चालणेस पात्र नाही. वास्तविक रजि.दस्त नंबर २६९/२०१८, दि.१६/०२/२०१८ चे खरेदीखत वादीस तेव्हापासून माहिती असून सदर खरेदीखताने प्रतिवादी नं.१ चे नावची नोंद दावा मिळकतीचे ७/१२ पत्रकी सन २०१८ मध्येच झालेली आहे. तसेच भारतीय नोंदणीचे कायद्यानुसार नोंदणीकृत दस्ताची माहिती नोंदणी दिवशीच सर्व जनतेस झाल्याचे गृहीतक आहे. त्यामुळे रजि.दस्त नंबर २६९/२०१८, दि.१६/०२/२०१८ चे खरेदीपत्राबाबत हक्कज्ञापनाची मागणी मुदतबाह्य आहे व त्यास मुदतीचा बाधा येतो. वास्तविक वादी यांनी केवळ हक्कज्ञापन व मनाईचा दावा करणे अपेक्षित नाही. दावेतील वस्तुस्थिती पाहता वादी यांनी वाटणीचा दावा दाखल करणे गरजेचे होते. तथापी वादी यांनी वाटपाचा दावा दाखल न केल्याने केवळ हक्कज्ञापन व कायम मनाईचा दावा कायद्याने चालणेस पात्र नाही व त्यामुळे वादीचा मनाईचा अर्ज देखील चालणेस अपात्र आहे.



Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

५) तुकाराम गोपाळा पाटील हे वादी, प्रतिवादी नं.१ यांचे वडिल होय. सदर तुकाराम गोपाळा पाटील यांना वादी व प्रतिवादी नं.१ खेरीज बाळासो तुकाराम पाटील, भारती आनंदा कोकणे व सखुबाई मालवेकर ही तीन अन्य अपत्येदेखील आहेत. सदर तुकाराम गोपाळा पाटील हे त्यांचे कुटूंबाचा कर्ता पुरुष होय. तुकाराम गोपाळा पाटील यांचेकडेच त्यांचे हिंदू एकत्र कुटूंबाचा सर्व आर्थिक व्यवहार व कारभार असे. सदर तुकाराम गोपाळा पाटील यांना त्यांची पत्नी सोनाबाई तुकाराम पाटील या हयात असताना औषधोपचाराकरिता रोख रक्कमेची गरज भासत असे. यातील वादी यांनी स्वत:चे आईचे औषधोपचाराकरिता रक्कम खर्च करणेस नकार दिला. किंबहुना वादी याने एकत्र कुटूंबातील खर्चाची कोणतीही जबाबदारी उचलली नाही. त्यामुळे तुकाराम गोपाळा पाटील यांनी वेळोवेळी सदर सोनाबाई तुकाराम पाटील यांचे औषधोपचाराकरिता प्रतिवादी नं.१ या आपल्या मुलगीकडे रोख रक्कमेची मागणी केली. त्याप्रमाणे प्रतिवादी नं.१ ने देखील वेळोवेळी रक्कम रुपये ३,३०,०००/- आपले वडिल तुकाराम गोपाळा पाटील यांना रोखीने अदा केले. त्यामुळे तुकाराम गोपाळा पाटील यांनी सदर रक्कमेच्या मोबदल्यात दावा मिळकत प्रतिवादी नं.१ यांना रजि.दस्त नंबर २६९/२०१८, दि.१६/०२/२०१८ इ. रोजीचे



Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

नोंदणीकृत खरेदीपत्राने विक्री केलेली आहे. सदरचे खरेदीखत तुकाराम गोपाळा पाटील यांनी आपले कुटूंबाचा कर्ता  नात्याने प्रतिवादी नं.१ चे हक्कामध्ये लिहून दिलेले असून सदर खरेदीपत्रास वादी, प्रतिवादी नं.१ चा भाऊ बाळासो तुकाराम पाटील यांनी संमती दिलेली आहे. वास्तविक सदर तुकाराम गोपाळा पाटील यांनी सदरचे खरेदीखत हिंदू एकत्र कुटूंबाचा कर्ता या नात्याने प्रतिवादी नं.१ चे हक्कात लिहून दिलेले असल्याने कायद्याने सदरचे खरेदीपत्रास वादी अगर तुकाराम गोपाळा पाटील यांचे अन्य अपत्यांची संमती घेण्याचे कायद्याने गरजेचे नाही. याउलट सदरचा दस्त हा तुकाराम पाटील यांनी एकत्र कुटूंब प्रमुख नात्याने कौटुंबिक गरजेकरिता केलेला असल्याने सदरचा दस्त वादी व अन्य तुकाराम यांचे अपत्यांवरती कायद्याने बंधनकारक आहे.

६) अशाप्रकारे प्रतिवादी नं.१ ही वर नमूद रजि.दस्त नंबर २६९/२०१८, दिनांक १६/०२/२०१८ चे खरेदीपत्राने दावा मिळकतीची मालक व कब्जेवहिवाटदार झालेली असून सदर नोंदणीकृत खरेदीपत्रानुसार फेरफार प्रमाणित होवून प्रतिवादी नं.१ चे नाव दावा मिळकतीचे ७/१२ पत्रकी मालक,वहिवाटदार म्हणून नोंद झालेले आहे. सदरचा फेरफार वादीनी



Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

आजतागायत आव्हानीत केलेला नाही. सदर फेरफार हा वादीवरती बंधनकारक आहे. यातील वादीखेरीज तुकाराम गोपाळा पाटील यांचे अन्य अपत्यांनी प्रतिवादी नं.१ चे हक्कातील खरेदीपत्राबाबत आजतागायत कोठेही तक्रार केलेली नाही. त्याचप्रमाणे वादीला देखील सदर खरेदीपत्राची पूर्ण माहिती असताना केवळ पश्चात बुध्दीने प्रस्तुतचा दावा वादीनी दाखल केलेला आहे.

७) प्रतिवादी नं.१ हीच दावा मिळकतीची वर नमूद नोंदणीकृत खरेदीपत्राने पूर्ण मालक व कब्जेवहिवाटदार होय. वादीची दावा मिळकतीमध्ये कधीही कब्जेवहिवाट नव्हती व नाही. दावा मिळकतीमध्ये वादीने बेकायदेशीरपणे प्रतिवादी नं.१ यांचे कब्जेवहिवाटीस हरकत,अडथळा केला, त्यावेळी प्रतिवादी नं.१ ने वादीविरुध्द कागल पोलिस स्टेशन यांचेकडे दि.२९/०६/२०२३ इ. रोजी फिर्याद देखील दिलेली आहे. वादी हा केनवडे, ता.कागल येथील पाटील गल्ली मधील ग्रा.मि.नं.९३ या मिळकतीमध्ये राहणेस आहे. दावा मिळकतीमध्ये वादी याचे घर नसल्याने दावा मिळकतीमध्ये वादी राहत असल्याचे दावेतील कथन पूर्णपणे खोटे व चुकीचे आहे.

..८/-

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

८) प्रतिवादी नं.१ यास स्वत:चे कौटुंबिक खर्चाकरिता रक्कमेची गरज पडल्याने प्रतिवादी नं.१ यांनी दावा मिळक़तीची विक्री करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे यातील प्रतिवादी नं.२ यांचेबरोबर प्रतिवादी नं.१ यांची बोलणी झाली व दावा मिळकत प्रतिवादी नं.१ यांनी प्रतिवादी नं.२ यांना रजि.दस्त नंबर ११४/२०२६, दि.१४/०१/२०२६ इ.रोजीचे नोंदणीकृत खरेदीपत्राने रक्कम रुपये ४,२०,०००/- चे मोबदल्यात खरेदी दिली व तेव्हापासून प्रतिवादी नं.२ ही दावा मिळकतीची पूर्ण मालक व कब्जेवहिवाटदार होय. सदर नोंदणीकृत खरेदीपत्राने फेरफार नंबर २४५९ चा फेरफार प्रमाणीत झालेला असून प्रतिवादी नं.२ चे नाव दावा मिळकतीचे ७/१२ पत्रकी मालक, वहिवाटदार म्हणून नोंद झालेले आहे. अशाप्रकारे दावा मिळकत ही पूर्णपणे प्रतिवादी नं.२ च्या मालकी वहिवाटीची मिळकत असून वादीने दावेमध्ये दावा मिळकतीच्या चतु:सिमा दर्शवत असताना पूर्वेकडील चतु:सिमा बंडू संतू पाटील असे चुकीचे नमूद केले आहे. वास्तविक दावा मिळक़तीच्या पूर्वेस रस्ता आहे.

९) दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी नं.२ चीच मालकनात्याने कब्जेवहिवाट खरेदी तारखेपासून चालू झालेली असून वादीची दावा मिळक़तीमध्ये

..९/-

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

मालकी अगर कब्जेवहिवाट नाही. जर प्रतिवादी नं.२ विरुध्द मनाई आदेश झालेस वादी हा दांडगाव्याने दावा मिळकतीचा कब्जा प्रतिवादी कडून काढून घेणेची शक्यता आहे. याउलट वादी यांना वाटपाचा दावा दाखल करणेची मुभा असताना व वाटपाचा दावा दाखल करणे हाच वादीकडे उपलब्ध योग्य पर्याय असताना त्याप्रमाणे वादीने वाटपाची दाद न मागितल्याने प्रस्तुतचा दावा स्पेसिफिक रिलीफ ॲक्ट कलम ४१एच नुसार कायद्याने चालणेस पात्र नाही.

१०) वादीस सकृतदर्शनी केस नाही. न्यायाचा तराजू प्रतिवादीचे बाजूने आहे. जर मे.कोर्टांनी वादीचा मनाईचा अर्ज मंजूर केला तर प्रतिवादींचे अतोनात नुकसान होणार आहे. याउलट सदर मनाईचा अर्ज नामंजूर झाला तर वादीचे काहीही नुकसान होत नाही.

११) केवळ प्रतिवादी नं. १ व २ यांना शारीरिक,आर्थिक व मानसिक त्रास देणेसाठी वादीनी खोट्या दाव्याची रचना केलेली आहे. त्यामुळे वादीकडून प्र.वादी नं.१ व २ यांना नुकसान भरपाई म्हणून रक्कम रुपये ५०,०००/- याच कामी वसूल होवून मिळावेत.



Asslt. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

१२) **तरी प्रतिवादी नं.१ व २ ची विनंती की,**

अ) वादीचा दावा व तुर्तातूर्त मनाईचा अर्ज कोर्ट खर्चासह नामंजूर करणेत यावा.

ब) जरुर तर जादा कैफियत देणेस परवानगी मिळावी.

क) न्यायाचे सर्व हुकूम याच कामी करणेत यावेत.

..........येणेप्रमाणे कैफियत, म्हणणे असे.

1] स.नि.डा.हा.अं. शेवंता शिवाजी पाटील यांचा असे द.

कागल

ता.२३/०३/२०२६

2]

## प्रतिज्ञा

आम्ही प्रतिवादी या लेखाद्वारे अशी सत्य प्रतिज्ञा करतो की, वरील कैफियतीमधील सर्व मजकूर आमचे माहितीप्रमाणे व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा. आज मु।। कागल,ता.२३/०३/२०२६.

1] स.नि.डा.हा.अं. शेवंता शिवाजी पाटील यांचा असे द.

2]



Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

## ॲफिडेव्हीट

मी प्रतिवादी नं.१ शेवंता शिवाजी पाटील, व.व.६८, धंदा-शेती, रा.बिद्री, ता.कागल, जि.कोल्हापूर देवाची शपथ घेवून सत्य प्रतिज्ञेवर असे ॲफिडेव्हीट करते की, वरील कैफियतीमधील सर्व मजकूर माझे माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले ॲफिडेव्हीट आज मु।। कागल, ता.२३/०३/२०२६.

I know the Deponent
K.A.K.
(Adv. K.A. Kulkarni)

स.नि.डा.हा.अं
शेवंता शिवाजी पाटील
यांचा असे द.

## प्रतिज्ञा

मी प्रतिवादी नं.१ या लेखाद्वारे अशी सत्य प्रतिज्ञा करते की, वरील ॲफिडेव्हीट मधील सर्व मजकूर माझे माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा,आज मु।। कागल,ता.२३/०३/२०२६.

स.नि.डा.हा.अं
शेवंता शिवाजी पाटील
यांचा असे द.

Solemnly Affirmed before me by
Smt. Shewanta Shivaji Patil
Age 68 of Bidri, Kagal who is
identified by Shri K.A. Kulkarni
.............whom I know personally
Dated :- 23/3/26

Assistant Superintendent